# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date 26 December 2025

## Time 11.00 to 11.05 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक २६ डिसेंबर २०२५ सकाळी ११.०० वाजता

****

देशासाठी बलिदान देणाऱ्या वीर बालकांप्रति समाज सदैव कृतज्ञ राहील, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. आज वीर बाल दिनाच्या पार्श्वभूमीवर 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार' राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावर्षी १८ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशात विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या २० बालकांना हे पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं.

****

वीर बाल दिवस' आज साजरा केला जात आहे. शीख धर्माचे दहावे गुरु गोविंदसिंह यांचे सुपुत्र साहिबजादे बाबा जोरावर सिंग आणि साहिबजादे बाबा फतेह सिंग यांच्या हौतात्म्याचं स्मरण करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरील संदेशात वीर साहिबजाद्यांच्या बलिदानासोबतच माता गुजरीदेवी यांची अढळ श्रद्धा आणि गुरु गोबिंदसिंह यांचे शाश्वत उपदेश यांचं स्मरण केलं. हा दिवस धैर्य आणि धर्मनिष्ठेचे प्रतीक असून, साहिबजाद्यांचं जीवन आणि त्यांचे आदर्श देशाच्या भावी पिढ्यांना सदैव प्रेरणादायी ठरतील, असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे. या दिनानिमित्तनं दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित कार्यक्रमाला पंतप्रधान उपस्थित राहणार आहे.

****

हुतात्मा उधम सिंग यांच्या १२६ साव्या जयंतीनिमित्त आज त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. तत्कालिन पंजाबमधील सुनाम इथं **१८९९** साली जन्मलेल्या उधम सिंग यांनी जालियनवाला बाग हत्याकांडाचा सूड घेत तत्कालीन पंजाबचे

लेफ्टनंट गव्हर्नर मायकेल ओ'ड्वायर यांची हत्या केली होती. ब्रिटिशांच्या कैदेत असताना त्यांनी राम मोहम्मद सिंग आझाद हे नाव स्वीकारले, जे भारतातील तीन प्रमुख धर्मांचं आणि वसाहतवादविरोधी भूमिकेचं प्रतीक होतं.

****

पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादामुळे वाढणाऱ्या धोक्यांच्या पार्श्वभूमीवर जम्मू-कश्मीर पोलिसांनी अंतर्गत सुरक्षा बळकट करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता सुसज्ज सुरक्षा प्रणाली सुरू करण्याची घोषणा केली आहे. ही प्रणाली सीमावर्ती आणि अंतर्गत भागांमध्ये देखरेख, गुप्तचर माहिती संकलन आणि त्वरित प्रतिसाद व्यवस्था अधिक प्रभावी करेल. या एआय सुरक्षा प्रणालींमध्ये विविध प्रयोगांचा समावेश असेल, ज्यामध्ये पुराव्याचे विश्लेषण जलद करणे समाविष्ट आहे. यामुळे तपासाचा वेळ आठवड्यांवरून तासांपर्यंत कमी होऊ शकतो.

****

रेल्वेची भाडेवाढ मध्यरात्रीपासून लागू झाली. यात अनारक्षित किंवा द्वितीय श्रेणीच्या प्रवास भाड्यात पहिल्या २१५ किलोमीटर अंतरापर्यंत काहीही बदल झालेला नाही. त्यापेक्षा अधिक अंतराच्या प्रवासासाठी द्वितीय श्रेणीच्या भाड्यात प्रति किलोमीटरमागे एक पैसा तर एक्स्प्रेस गाड्यांच्या प्रवासात प्रति किलोमीटरमागे दोन पैसे भाडेवाढ झाली आहे. या भाडेवाढीपूर्वी प्रवासाचं आगाऊ आरक्षण केलेल्या प्रवाशांना कोणतंही अतिरिक्त शुल्क द्यावं लागणार नाही

****

यमगरवाडीसारखे सेवा प्रकल्प, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शतकपूर्तीच्या वाटचालीत पथदर्शी असल्याचे गौरवोद्गार संघाचे माजी सरकार्यवाह भय्याजी जोशी यांनी काढले. ते काल धाराशिव जिल्ह्याच्या तुळजापूर तालुक्यातल्या यमगरवाडी प्रकल्पात ज्येष्ठ स्वयंसेवकांच्या सन्मान समारंभात बोलत होते. या कार्यक्रमात भैय्याजी जोशी यांच्या हस्ते पद्मश्री भिकुजी तथा दादा इदाते, पद्मश्री गिरीश प्रभुणे, डॉक्टर अभय शहापूरकर, डॉक्टर राघवेंद्र डंबळ, महादेवराव गायकवाड, वैजनाथ आप्पा लातूरे यांच्यासह या यमगरवाडी प्रकल्पावर पूर्णवेळ सेवा देणाऱ्या ओक आणि पवार दांपत्याचा सत्कार करण्यात आला.

****

हक्क न सांगितलेल्या मालमत्तेचा निपटारा करण्यासाठी राज्यभर विशेष शिबिरांचं आयोजन करण्यात येत आहे. राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या वतीनं जिल्हा अग्रणी बँकेमार्फत बीड इथं येत्या २९ डिसेंबरला हे शिबीर घेण्यात येत आहे.

****

लातूरच्या आडत बाजारात सोयाबीनचा दर प्रतिक्विंटल पाच हजार रुपयांवर पोहचला आहे. हा या वर्षातला सर्वाधिक दर असून, नव्या वर्षात यात आणखी वाढ होण्याची अपेक्षा शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे. मात्र शासनाच्या हमीभावापेक्षा प्रतिक्विंटल चारशे ते पाचशे रूपये कमी दर असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

दोन वेळा ऑलिंम्पिक पदक विजेती भारतीय बॅडमिंटनपटू पी व्ही सिंधूची २०२६ ते २९ या कालावधीसाठी बॅडमिंटन जागतिक महासंघ ॲथलीट्स आयोगाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. या भूमिकेत, सिंधू जागतिक बॅडमिंटनच्या धोरणांमध्ये आणि प्रशासनात बॅडमिंटनपटूंचा आवाज बळकट करण्यासाठी काम करेल.

****

महिला क्रिकेटमध्ये भारत आणि श्रीलंका दरम्यान तिसरा टी–ट्वेंटी सामना आज तिरूवनंतपुरम इथं खेळवला जाणार आहे. संध्याकाळी सात वाजता सामन्याला सुरूवात होईल. पाच सामन्यांच्या मालिकेत भारतीय महिला संघ दोन – शून्यने आघाडीवर आहे.

****